सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता वन महोत्सव (२४०६ ८५५१) लेखाशीर्षांतर्गत उर्वरित अनुदान वितरण करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः सावनि-२०१७/प्र.क्र.८६/फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २० मार्च २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक सावनि-२०१७/ प्र.क्र. ७४/ फ-११,दि. २५.०५.२०१७

२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सावनि-२०१७/ प्र.क्र.५४/फ-११ दि. १५.०४.२०१७

३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७

४) शासन परिपत्रक क्र. अर्थसं.-२०१७/ प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. ०६.०२.२०१८

५) महसूल व वन विभाग, ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१८/२४०६/ प्र.क्र. ३१/ ब-१,दि. १२.०३.२०१८

प्रस्तावना :-

दिनांक ५ जून ते १५ ऑगस्ट हा काळ वन महोत्सवाचा काळ म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. या कालावधीत वनीकरणासाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा करण्यात येत असतो सदर योजना सन २०१६-१७ साठी पुढे चालू ठेवण्यास उपरोक्त संदर्भ क्रमांक १वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. यावर्षी या योजनेंतर्गत " रोपे आपल्या दारी " हा कार्यक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच ५० कोटी वृक्ष लागवड कार्यमक्रमांतर्ग रोपांचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर योजनेकरिता रु.५०००.०० लक्ष इतके अनुदान सन २०१७-१८ करिता अर्थसंकल्पित करण्यात आले आहे. त्यापैकी जून ते डिसेंबर २०१७ अखेर या कालावधीकरिता रु. ३९९१.९८ लक्ष इतका निधी शासन निर्णय दि. ७.०६.२०१७ अन्वये वितरित करण्यात आलेला आहे.

आता वित्त विभागाने चालू वित्तीय संपूर्ण वर्षाकरिता मंजूर केलेल्या आठमाही सुधारित अंदाजानुसार उपरोक्त लेखाशिर्षासाठी रु.४७३०.०० लक्ष खर्च करण्यास विभागास प्राधिकृत केले आहे. त्यानुसार रु.७३८.०२ लक्ष निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणा-या **"वनमहोत्सव (२४०६ ८५५१)"** या योजनेकरिता रु.५०००.००लक्ष इतका निधी मार्च, २०१७ मधील अर्थसंकल्पिय अधिवेशनात अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्यापैकी जून ते डिसेंबर २०१७ अखेर या कालावधीकरिता रु. ३९९१.९८ लक्ष इतका निधी शासन निर्णय दि. ७.०६.२०१७ अन्वये वितरित करण्यात आलेला आहे. आता वित्त विभागाने चालू वित्तीय संपूर्ण वर्षाकरिता मंजूर केलेल्या आठमाही सुधारित अंदाजानुसार उपरोक्त लेखाशिर्षासाठी रु.४७३०.०० लक्ष खर्च करण्यास विभागास प्राधिकृत केले आहे. त्यानुसार रु. ७३८.०२ लक्ष निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. विवरणपत्र-१ प्रमाणे निधी वितरणाचा कॅश फ्लो सोबत जोडला आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यवध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

"मागणी क्र.सी-७,
२४०६ वनीकरण व वन्यजीवन,
१०१- वनसरंक्षण व विकास व पुनर्निर्मित-
(११)(३४) वनमहोत्सव (२४०६ ८५५१)
०२- मजूरी, २१ पुरवठा व साहित्य, २६ जाहिरात व प्रसिध्दी

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच शासन परिपत्रक क्र. अर्थसं.-२०१७/ प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. ०६.०२.२०१८, महसूल व वन विभागाच्या शासन ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१८/२४०६/ प्र.क्र. ३१/ ब-१,दि. १२.०३.२०१८ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२११२२८३५६२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.21 12:31:02 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
५. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
६. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई४०० ०३२.
९. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१०. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. निवडनस्ती/फ-११.

विवरणपत्र -१

शासन निर्णय क्र.सावि-२०१७/प्र.क्र.८६/फ-११, दि. २० मार्च २०१८

योजनेचे नावः- “वनमहोत्सव” मुख्यलेखाशीर्ष- (२४०६ ८५५१)

(रु. लाखात)

सविस्तर लेखाशीर्ष	अर्थ संकल्पित तरतूद	आठमाही सुधरित अंदाजानुसार वितरणासाठी उपलब्ध तरतूद	वितरित केलेली तरतूद	मार्च. २०१८	एकूण
१	२	३	४	५	६
“मागणी क्र.सी-७, २४०६ वनीकरण व वन्यजीवन, १०१- वनसरंक्षण व विकास व पुननिर्मित- (११)(३४) वनमहोत्सव (२४०६ ८५५१) ०२- मजूरी, २१ पुरवठा व साहित्य, २६ जाहिरात व प्रसिध्दी	५०००.००	४७३०.०० ०२- मजूरी- रु.३६.५० २१- पुरवठा व सामग्री-रु.१०६५.२० २६ जाहिरात- रु. १४८०	३९९१.९८	७३८.०२	७३८.०२

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.03.21 12:31:20 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग